कृष्णा महाविद्यालय विकास समितीची बैठक दि. २१/०७/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वा महाविद्यालयात आयोजित केली होती त्या वेळेस खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | नाव |
|---|---|
| १ | मा. डॉ. सुरेश जयवंतराव भोसले<br>अध्यक्ष, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बु |
| २. | मा. श्री. दिलीपराव रामराव पाटील<br>सचिव, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बु॥. |
| ३. | मा. डॉ. अतुल सुरेश भोसले<br>सदस्य, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बु॥ |
| ४ | मा. श्री. संग्राम विश्वासराव पाटील<br>संचालक, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बु॥ |
| ५ | मा. श्री. विनायक सुरेश भोसले<br>सदस्य, शिक्षण क्षेत्र तज्ञ. |
| ६ | डॉ. चंद्रकांत बाबुराव सांकुंखे<br>प्राचार्य, कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु॥<br>सचिव. |
| ७ | डॉ. दिलीप राजाराम कुंभार<br>समन्वयक, नॅक समिती |
| ८ | डॉ. उमाजी सुरेश दळवी<br>शिक्षक प्रतिनिधी |
| ९ | डॉ. प्रविणचंद्र दिनकर भाकरे<br>शिक्षण प्रतिनिधी. |
| १० | श्रीमती. माधवी सुरेंद्र पवार<br>शिक्षक महिला प्रतिनिधी. |

११ मा. श्री. आमराव रामचंद्र सावंत
सदस्य, औद्योगिक क्षेत्र तज्ञ

१२ मा. श्री. अशोक मारुती सोमदे
माजी विद्यार्थी प्रतिनिधी

१३ श्री. भरत भिमराव वानखडे
शिक्षकेत्तर सेवक प्रतिनिधी

वरील प्रमाणे सदस्य उपस्थित झालेनंतर मा. डॉ. सुरेश जयवंतराव भोसले यांचे अध्यक्षतेखाली ठिक ११:०० वाजता सभेचे कामकाज सुरु झाले. सभेमध्ये पुढील विषयावर चर्चा करण्यात आली.

विषय क्र. १ दि. १५/०२/२०२२ रोजी झालेल्या महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्र. १ दि. १५/०२/२०२२ रोजी झालेल्या महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.

सूचक - श्री. दिलीपराव रामराव पाटील
अनुमोदक - डॉ. ढवळी डी. एस.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र-२ मास्टर सॉफ्टवेअर, नागपूर यांच्याकडून घेण्यात आलेले सॉफ्टवेअर नुतनीकरणा संदर्भात चर्चा करणे.

ठराव क्र-२ मास्टर सॉफ्टवेअर नागपूर यांचेकडून घेण्यात आलेले ऑफिस ॲटोमेशन सॉफ्टवेअरचे नुतनीकरण करण्यात यावे व सिनिअर विभाग अंतर्गत सॉफ्टवेअर उपयुक्त असल्याने गतवर्षीच्या दराने चालू शैक्षणिक वर्षासाठी नुतनीकरण करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. भाकरे पी. डी.
अनुमोदक - डॉ. ढवळी डी. एस.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ३ कृष्णा महाविद्यालय वेबसाईट नुतनीकरण करणेबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ३ आराध्य सॉफ्टवेअर कराड हे कॉलेज वेबसाईटचे काम वेळेत पूर्ण करत असल्यामुळे मागील वर्षीच्या दराप्रमाणे चालु शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ ने या वर्षासाठी नूतनीकरण करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. सी. बी. साळुंखे

अनुमोदक - डॉ. पी. डी. भाकरे

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ४ महाविद्यालयातील विविध घटकांचा घेण्यात आलेला फिडबॅक संदर्भात चर्चा करणे व त्यानुसार कार्यवाही करणे.

ठराव क्र ४ महाविद्यालयातील विनिअर विभागांतर्गत विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून फीड बॅक प्राप्त झालेला असून विद्यार्थ्यांनी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारांकडून केलेल्या सुचनांची अंमलबजावणी करण्यात यावी व उचित कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. सी. बी. साळुंखे

अनुमोदक - डॉ दळवी डी. एस

विषय क्र. ५ नॅक समिती, बंगलोर भेटीचा दिनांक निश्चित करणे व फी भरणे संदर्भात चर्चा करणे.

ठराव क्र. ५ नॅक समिती, बॅंगलोर महाविद्यालयास भेट देण्यासाठी प्रत्यक्ष

१) दि. ०५-०९-२०२३ व ०६/०९/२०२३

२) दि. ११-०९-२०२३ व १२-०९-२०२३

३) दि. १५-०९-२०२३ व १६-०९-२०२३

वरील प्रमाणे तारखा कळविण्यात यावे असे ठरले त्याचप्रमाणे नॅक लॉजिस्टीक फी रक्कम रु. २,३६,०००/- नॅक कार्यालयास भरणा करावी व ती कमिटी प्रत्यक्षात भेट देणार त्या वेळी त्यांचा दैनंदिन खर्चासाठी रक्कम रुपये १,५०,०००/- मंजूर करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. दळवी डी. एस.

अनुमोदक - डॉ. साळुंखे सी. बी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ६ नॅक समिती, बॅंगलोर भेटीच्या अनुषंगाने विविध भौतिक सोयी सुविधा तयार करणे बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ६ नॅक समिती सदस्य कॉलेजला प्रत्यक्ष भेट देणार आहे. त्यावेळी खालील भौतिक सुविधांची उपलब्धता असणे गरजेचे आहे.

(पुढील पानावर)

१) कॉलेज Appoach (Access) रोड तयार करणे.
२) खेळांचे मैदान व ट्रॅक तयार करणे.
३) कॉलेज परिसर वृक्ष लागवड करणे.
४) कॉलेज इमारत A व B च्या खालील मगाल लॉन (गवताचे) तयार करणे
५) वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र विभागाचे फर्निचर करणे.
६) विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर स्टाफ यांच्या वाहनतळाची सोय करणे
७) कॉलेज इमारत विंग B रंगकाम करणे.
८) कार्यालयातील फर्निचरचे नूतनीकरण करणे.

वरील भौतिक सुविधांची पूर्तता तातडीने करावी असे सर्वानुमते ठरले.

सूचक - श्री. डी. आर. पाटील
अनुमोदक - डॉ. सी. बी. साळुंखे
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.-७ विविध विभागासाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदी करणेस मंजूरी देणे.

ठराव क्र. ७ नॅकच्या अनुषंगाने
१) कॉलेज मधील विविध सूचना फलक, नेमप्लेट साठी रु. २,५०,०००/-
२) वनस्पती व प्राणीशास्त्र विभागासाठी फर्निचर करणे करिता रु. ३,५०,०००
३) अमृत उद्यान संवर्धनासाठी कॉलेज परिसरातील वृक्षारोपन व लागवडीसाठी रु. २,००,०००/- इ. खर्चास मंजूरी सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. दळवी डी. एस.
अनुमोदक - डॉ. भाकरे पी. डी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ८ जिमखाना विभागासाठी मैदान तयार करणे व विभागास आवश्यक असणारे साहित्य खरेदी करणेस मंजूरी देणे.

ठराव क्र. ८ सिनियर महाविद्यालयातील खेळाडूंना खेळाचे मैदान करण्यासाठी साधारण खर्च रु. १,००,०००/- व जिमखाना, जिमनॅशियम साठी आवश्यक असणारे साहित्य खरेदी करणेसाठी रु. ६०,०००/- मंजूर करणेत यावे असे सर्वानुमते ठरले.

सूचक - श्री. पाटील डी. आर.
अनुमोदक - डॉ. दळवी डी. एस.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ९ ग्रंथालय विभागासाठी आवश्यक असणारी पुस्तके खरेदी संदर्भात चर्चा करणे.

ठराव क्र. ९ सिनिअर कला, वाणिज्य व शास्त्र शाखेतील विभाग प्रमुखांनी त्यांच्या शिफारशी नुसार विहित खरेदी प्रक्रियेने ग्रंथालय विभागासाठी पुस्तके खरेदी करावीत असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. भाकरे पी. डी.
अनुमोदक - डॉ. साळुंखे सी. बी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १० महाविद्यालयामध्ये ICT सुविधा उपलब्ध करणेसाठी मिटींग हॉल मध्ये LED screen व दोन कॉम्प्युटर व कलर प्रिंटर खरेदी करणे बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. १० नॅक कमिटी महाविद्यालयास भेट देणार या अनुषंगाने मिटींग हॉल मध्ये आय. सी. टी. सुविधा, दोन कॉम्प्युटर व दोन कलर प्रिंटर खरेदी करणेसाठी २,५०,०००/- + ४०,०००/- = २,९०,०००/- रक्कम रुपये सर्वानुमते मंजूर करण्यात आली.

सूचक - डॉ. साळुंखे सी. बी.
अनुमोदक - डॉ. दळवी डी. एल.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ११ सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचे अॅकडमीक व अॅडमिस्ट्रेटीव्ह ऑडीट करणे संदर्भात चर्चा करणे

ठराव क्र. ११ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत महाविद्यालयाचे अॅकडमीक व अॅडमिस्ट्रेटीव (AAA) ऑडीट करणे आवश्यक आहे. त्यानुसार विद्यापीठ नियमानुसार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व स्थानिक निवड कमिटी यांच्याकडून महाविद्यालयाचे ऑडीट करणे असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. भाकरे पी. डी.
अनुमोदक - डॉ. पाटील डी. आर.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १२ बी. कॉम शाखा शिक्षक कर्मचारी यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी नियुक्ती आदेश देणे बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. १२ सिनिअर विभाग कायम-विनाअनुदानित बी. कॉम शाखेतील सन २०२३-२४ मध्ये जाहिरात प्रसिध्द करून रितसर मुलाखती घेऊन विषय कार्यभारानुसार आवश्यक असणारे पूर्णवेळ ३ शिक्षक नियुक्तीसाठी संस्था प्रशासनाकडे मागणी करावी असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. दळवी डी. एस.
अनुमोदक - डॉ. भाकरे पी. डी.
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ९३ संस्था अंतर्गत महाविद्यालयामध्ये २ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची नियुक्त करणे बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ९३ महाविद्यालयातील प्रसाधन गृहांच्या दैनंदिन स्वच्छतेसाठी २ स्विपर व उपवन उद्यान संवर्धन देखभाल करणेसाठी एक माळी नियुक्त करणेत यावा असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. साळुंखे सी. बी.
अनुमोदक - डॉ. दळवी डी. एस.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ९४ सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी संस्था अंतर्गत CHB शिक्षक नेमणूक बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ९४ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व शासन यांच्या CHB उमेदवारांच्या नियमानुसार जाहिरात देऊन स्थानिक निवड समिती मार्फत मुलाखती घेतल्या नंतर निवडप्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या कार्यभारावर रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, या विषयाकरिता संस्था अंतर्गत CHB उमेदवारांची स्थानिक निवड समितीनुसार निवड करून हजर करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. भाकरे पी. डी.
अनुमोदक - डॉ. साळुंखे सी. बी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ९५ पर्यावरणशास्त्र विषयाचे शिक्षकांचे थकीत मानधन देणे बाबत चर्चा करणे

ठराव क्र. ९५ पर्यावरणशास्त्र विषयाच्या शैक्षणिक वर्षातील पर्यावरण विषयाच्या अध्यापन कामकाज ज्या त्या वर्षी समाधान कारक केलेले असल्यामुळे विद्यापीठ नियमानुसार त्यांना देय असणारे थकीत मानधन अदा करावे असे सर्वानुमते ठरले

सूचक - डॉ. साळुंखे सी. बी.
अनुमोदक - डॉ. भाकरे पी. डी.
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.९६ ऐन वेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ऐन वेळी कोणताही विषय नसल्याने मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सचिव,
महाविद्यालय विकास समिती
कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु॥

अध्यक्ष,
महाविद्यालय विकास समिती
कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु॥

कृष्णा महाविद्यालय विकास समितीची बैठक दि. 20/12/2023 रोजी सकाळी ठिक ११.०० वा महाविद्यालयात आयोजित केली होती त्या वेळेस खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ. नं. | नाव | सही |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. सुरेश जयवंतराव भोसले<br>अध्यक्ष, शे. शि. प्र. मंडळ, रेठरे बु॥. | [signature] |
| २) | मा. श्री. दिलीपराव रामराव पाटील<br>सचिव, शे. शि. प्र. मंडळ, रेठरे बु॥. | [signature] |
| ३) | मा. डॉ. अतुल सुरेश भोसले.<br>सदस्य, शे. शि. प्र. मंडळ, रेठरे बु॥. | |
| ४) | मा. श्री. संग्राम विश्वासराव पाटील<br>सदस्य, शे. शि. प्र. मंडळ, रेठरे बु॥. | |
| ५) | मा. श्री. विनायक सुरेश भोसले.<br>सदस्य, शिक्षण क्षेत्र तज्ञ. | |
| ६) | मा. डॉ. चंद्रकांत बाबुराव सादुखे<br>प्राचार्य, कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु॥ | [signature] 20/12/23 |
| ७) | डॉ. दिलीप राजाराम कुंभार.<br>समन्वयक, नॅक समिती | [signature] |
| ८) | डॉ. धनाजी सुरेश दळवी.<br>शिक्षक प्रतिनिधी | [signature] |
| ९) | डॉ. प्रविणचंद दिनकर भाकरे<br>शिक्षक प्रतिनिधी | [signature] |
| १०) | श्रीमती. माधवी सुरेंद्र पवार<br>शिक्षक महिला प्रतिनिधी | [signature] |

| अ.नं. | नाव | सही |
|---|---|---|
| ११) | मा. श्री. श्यामराव रामचंद्र सावंत<br>सदस्य, औद्योगिक क्षेत्र तज्ञ. | |
| १२) | मा. श्री. अशोक मारुती सोमदे<br>माजी विद्यार्थी प्रतिनिधी | [signature] |
| १३) | श्री. भरत भिमराव वाघडे<br>शिक्षकेत्तर सेवक प्रतिनिधी. | [signature] |

वरील प्रमाणे सदस्य उपस्थित झालेनंतर मा. अध्यक्ष डॉ. सुरेश जयवंतराव भोसले बाबा यांचे अध्यक्षतेखाली मिटींगचे कामकाज सुरु झाले. मिटींगमध्ये खालील विषयावर चर्चा करणेत आली.

विषय क्र.१ दि. २७-७-२०२३ रोजी झालेल्या महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्र.१. दि. २७-७-२०२३ रोजी झालेल्या महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करणेत आले.

सुचक - श्री. दिलीपराव रामराव पाटील
अनुमोदक - डॉ. भाकरे पी.डी.
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.२. दि. १६-८-२०२३ व १७-८-२०२३ रोजी नॅक समिती बेंगलोर यांनी महाविद्यालयास प्रत्यक्ष भेटीची व महाविद्यालयास मिळालेल्या $B^{++}$ मानांकनाचा अहवालाबाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र.२. दि. १६-८-२०२३ व १७-८-२०२३ रोजी नॅक समिती बेंगलोर यांनी महाविद्यालयास भेट दिली असता सदर समितीने $B^{++}$ ग्रेड महाविद्यालयास दिलेली असुन सदर समितीने महाविद्यालया संदर्भात काही त्रुटी दर्शविलेल्या आहेत त्या सुधारणेबाबत पुढील प्रमाणे चर्चा झाली.

१) स्कील डेव्हलपमेंट आणि करीअर कौन्सीलींग कमी होत आहे त्यामध्ये सुधारणा करुन सदरचे कोर्स वाढविण्यावर भर देणेत यावा.

२). विद्यार्थी संख्या उपलब्ध स्टाफ (शिक्षक) या मध्ये बरीच तफावत असल्यामुळे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विशेष कक्ष विभाग व मा.व.क्र पुणे यांचेकडून शिक्षक रोष्टर तपासणीकरुन शासन मान्यतेच्या आधारावर जादीत मान्यता घेवून रिक्त

विद्यापीठ निवडसमितीमार्फत रिक्त असणाऱ्या शिक्षकांच्या जागा भरण्यात याव्यात

३) महाविद्यालयातील शिक्षकांचेकडून २०१७-२०१८ ते २०२१-२०२२ या कालावधीमध्ये रिसर्च प्रोजेक्ट कमी प्रमाणात करण्यात आलेले आहेत ते यु.जी.सी. किंवा शासनांच्या फंडातून वाढविण्यात यावेत तसेच सेमिनार व कॉन्फरन्स ५ वर्षामध्ये कमी घेण्यात आलेल्या आहेत त्या वाढविण्यात याव्यात.

४) यु.जी.सी, महाराष्ट्र शासन, विद्यापीठ तसेच सामाजिक संस्था यांचेकडून महाविद्यालयास फंड मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत

५) लॅब, बिल्डींग, लायब्ररी व क्रिडांगण विद्यापीठ नियमाप्रमाणे असावे

६) स्पोर्ट ॲक्टीव्हीटी, कल्चरल ॲक्टीव्हीटी, कॅम्पस प्लेसमेंट महाविद्यालयात कमी होत असल्याने त्या वाढविण्यात याव्यात

७) एकसिट कमिटी रिपोर्ट टाइपकरून मा० अध्यक्षांचे निदर्शनास आणावा. असे सर्वानुमते ठरले

सूचक - श्री. दिलीपराव रामराव पाटील

अनुमोदक - डॉ. दळवी डी. एस.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.३ प्राचार्य, डॉ० साळुंखे चंद्रकांत बाबुराव यांना शासन निर्णयानुसार सेवा निवृत्तीची वयोमर्यादा ६२ वरून ६५ करणेबाबतचा प्रस्तावास विद्यापीठाकडून मान्यता प्राप्त झाली असून पुढे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांना प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केला आहे त्या संदर्भात विचार करणे.

ठराव क्र.३ प्राचार्य, डॉ. साळुंखे चंद्रकांत बाबुराव यांना शासन निर्णयानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६२ वरून ६५ करणेबाबतचा प्रस्तावास विद्यापीठाकडून मान्यता प्राप्त झालेली असुन पुढे विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांना प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केला आहे त्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली व त्याची नोंद घेण्यात आली.

सूचक - डॉ. भाळवे पी.डी.

अनुमोदक - डॉ. दळवी डी. एस.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.४ महाविद्यालयातील गणित विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डी. पाटील हरदास विष्णू हे दि. ३०-११-२०२३ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर व शिल्लक कार्यभारावर सी.एच.बी. शिक्षक नेमणूक करणे बाबत विचार करणे.

ठराव क्र.४ महाविद्यालयातील गणित विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. पाटील हरदास विष्णू हे दि ३०-११-२०२३ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचे रिक्त झालेल्या जागेवर कार्यभार तपासुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये या साठी तासिका तत्वावरील शिक्षकांची संस्था स्तरावर नियुक्ती करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

सूचक- डॉ. सी.बी. साळुंखे

अनुमोदक - श्री. दिलीपराव रामराव पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.५. डॉ. भाकरे प्रविणचंद्र दिनकर सहाय्यक प्राध्यापक भूगोल विषय यांना कॅस अंतर्गत स्टेज-४ लेव्हल १३A वरिष्ठ वेतनश्रेणी स्थान निश्चिती प्रस्ताव पाठविणेबाबत आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्र.५ महाविद्यालयात कार्यरत असलेले भूगोल विषयाचे प्राध्यापक डॉ. भाकरे प्रविणचंद्र दिनकर यांचा कॅस अंतर्गत स्टेज-४ लेव्हल १३A वरिष्ठ वेतनश्रेणी स्थान निश्चितीचा प्रस्ताव योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करुन विद्यापीठास पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. ढवळी डी. एस.

अनुमोदक - श्रीमती माधवी सुरेंद्र पवार

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.६ डॉ. निकम आर.डी. व डॉ. कुरणे एम.व्ही. यांचे कॅस अंतर्गत कॅस अंतर्गत प्रोफेसर पदाचे स्टेज-५ लेव्हल १४ प्रस्ताव विद्यापीठास पाठविणेबाबत आलेल्या अर्जावर चर्चा करणे

ठराव क्र.६ महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या इतिहास विषयाच्या प्राध्यापिका डॉ. निकम आरडी व हिंदी विषयाच्या प्राध्यापिका डॉ. कुरणे एम.व्ही. यांचे कॅस अंतर्गत प्रोफेसर पदाचे स्टेज-५ लेव्हल १४ प्रस्ताव ~~का~~ विद्यापीठास पाठविणेबाबत अर्ज प्राप्त झालेले असुन सदरचे प्रस्ताव पाठविणेबाबत निकष ठरविण्यात यावेत व त्या निकषानुसार प्रस्ताव विद्यापीठास पाठविण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले

सूचक- डॉ. ढवळी डी. एस.

अनुमोदक - डॉ. भाकरे पी.डी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.७ महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय सेवक यांना परविक्षाधिन कालावधी पुर्ण झाल्याने कन्फरमेशन ऑर्डर देणे बाबत चर्चा करणे

ठराव क्र.७ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांची या महाविद्यालयात २० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेली असुन संबंधित प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांना कन्फरमेशन ऑर्डर देण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

सुचक – डॉ. सी.बी. साळुंखे
अनुमोदक – श्री दिलीपराव रामराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.८ जिमखाना विभागाअंतर्गत महाविद्यालयातील खेळाडूंना गणवेश खरेदी करणे बाबत विचार करणे.

ठराव क्र.८ महाविद्यालयातील जिमखाना विभागाअंतर्गत खेळाडूसाठी कीट खरेदी करण्यात यावीत असे सर्वानुमते ठरले

सुचक – डॉ. दळवी डी.एस
अनुमोदक – डॉ. साळुंखे सी.बी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.९ सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी ग्रंथालय विभागासाठी पुस्तके खरेदी बाबत चर्चा करणे.

ठराव क्र.९ सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाची विद्यार्थी संख्या व उपलब्ध फंड लक्षात घेवून आवश्यकतेनुसार ग्रंथालय विभागाने पुस्तके खरेदी करावीत असे सर्वानुमते ठरले.

सुचक – डॉ. भाकरे पी.डी.
अनुमोदक – श्री दिलीपराव रामराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.१० दि. ३० व ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी सहाय्यक प्राध्यापक पदांच्या विद्यापीठ निवड समिती व शासन प्रतिनिधी मार्फत झालेल्या शिक्षक मुलाखतीच्या प्रस्ताव बाबत आढावा घेणे.

ठराव क्र.१० महाविद्यालयात दि ३० व ३१ ऑगस्ट २०२३ रोजी सहाय्यक प्राध्यापक पदाच्या विद्यापीठ निवड समिती व शासन प्रतिनिधी मार्फत झालेल्या शिक्षक निवड समिती मुलाखतीच्या प्रस्ताव मंजुरीसाठी विद्यापीठास सादर केलेला असुन विद्यापीठाने त्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी दर्शविल्या आहेत त्या पूर्ण करुन त्वरित मंजुरी घेण्यात यावी म्हणजे निवड झालेल्या शिक्षकांना लवकरात लवकर हजर करुन घेणे सोईचे होईल असे सर्वानुमते ठरले

सूचक - डॉ. दळवी डी. एल.
अनुमोदक - डॉ. साळुंखे सी. बी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ११ शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या AQAR रिपोर्ट नॅक बंगळोर यांना सादर करणेबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ११ सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचा महाविद्यालयाचा AQAR रिपोर्ट पाठविण्यासाठी आवश्यक असणारी माहिती संबंधित क्रटेरिया प्रमुखांकडून घेण्यात यावी व सदरचा AQAR रिपोर्ट नॅक समन्वयक यांनी नॅक बेंगळोर यांना लवकरात लवकर पाठवावा असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. दळवी डी. एल.
अनुमोदक - डॉ. साळुंखे सी. बी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १२ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांसाठी कोड ऑफ कंडक्ट (आचार संहिता) ठरविणे व त्यानुसार कामकाज करणे व उचित कारवाई करणे बाबत चर्चा करणे

ठराव क्र. १२ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांसाठी कोड ऑफ कंडक्ट (आचरण संहिता) तयार करण्यात यावी व माहिती शिक्षक शिक्षकेत्तर सेवकांना देण्यात यावी व त्यानुसार कामकाज करणेबाबत सर्वांना सुचना देण्यात याव्यात जे शिक्षक शिक्षकेत्तर सेवक कोड ऑफ कंडक्टचे पालन पालन करीत नाहीत अशा कर्मचाऱ्यांवर उचीत कारवाई करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

सूचक - डॉ. सी. बी. साळुंखे
अनुमोदक - डॉ. डी. एल. दळवी
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. १३ महाविद्यालयातील प्रयोगशाळा साहित्य व ग्रंथालय विभागातील कालबाह्य झालेली पुस्तके राईट ऑफ करणेबाबत चर्चा करणे

ठराव क्र. १३ महाविद्यालयातील प्रयोगशाळा साहित्य जे कालबाह्य झालेले आहे व सध्याच्या अभ्यासक्रमामध्ये नाही ते राईट ऑफ करण्यात यावे तसेच महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये असणारी कालबाह्य झालेली व अभ्यासक्रमामध्ये नसलेली पुस्तके रद्दीत घालण्यात यावीत असे सर्वानुमते

सूचक - डॉ. सी. बी. साळुंखे
अनुमोदक - श्री. दिग्विजय रामराव पाटील

विषय क्र.१४ सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचे Academic व Administrative ऑडिट करणे बाबत चर्चा करणे

ठराव क्र.१४ सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचे जॅकच्या अनुषंगाने Academic व जे Administrative ऑडिट होणे आवश्यक आहे ते करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले

सुचक - डॉ. सी.बी. सालुंखे
अनुमोदक - डॉ. भाकरे पी.डी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.१५ ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे
ऐनवेळी येणाऱ्या विषयामध्ये खालील विषयावर चर्चा करण्यात आली

विषय क्र.१ महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे बाबत विचार करणे

ठराव क्र.१ महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यामध्ये जे कर्मचारी पात्र आहेत अशा खालील कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात यावी व त्याचे पदोन्नतीचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.
1) श्री. शिंगाडे श्रीराम आनंदराव 2) श्री. पाटील विनायक हणमंतराव
3) श्री. माने अतुल दादासो 4) श्री. डोळस राहुल कुशाबा

सुचक - डॉ. भाकरे. पी.डी.
अनुमोदक - श्री. दिलीपराव रामराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.२ श्री. अशोक श्रीपती लाड सेवानिवृत्त कर्मचारी यांचे रजा रोखीकरण संदर्भात आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्र.२. महाविद्यालयातील सेवानिवृत्त मुख्य लिपिक श्री अशोक श्रीपती लाड हे दि. ३१ मे २०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असुन त्यांचा शिल्लक असणाऱ्या हक्काच्या रजेचा रोखीकरणाचा प्रस्ताव त्यांनी केलेल्या अर्जानुसार शासनास सादर करावा असे सर्वानुमते ठरले

सुचक - डॉ. भाकरे पी.डी.
अनुमोदक - श्री. दिलीपराव रामराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.३. महाविद्यालयाच्या इंटरनल ऑडिट संदर्भात चर्चा करणे.

ठराव क्र.३. महाविद्यालयाचे इंटरनल ऑडिट साठी श्री. प्रतिक जोशी यांचेशी चर्चा करुन त्यांची नियुक्ती करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले

सुचक - डॉ. सी.बी. सालुंखे
अनुमोदक - डॉ. भाकरे पी.डी. ठराव सर्वानुमते मंजूर.

| | |
|---|---|
| विषय क्र-४ | विना अनुदानीत वाणिज्य शाखेसाठी डॉ विषयासाठी गेस्ट लेक्चरर नेमणेबाबत चर्चा करणे |
| ठराव क्र.४ | विना अनुदानीत वाणिज्य शाखा बिझिनेस डॉ विषयासाठी आलेल्या अर्जानुसार ॲडव्होकेट सौ. पाटील सारिका हंसराज यांची गेस्ट लेक्चरर म्हणून मानधनावर सन २०२३-२४ या वर्षासाठी नियुक्ती करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. |
| | सूचक - श्रीमती माधवी सुरेंद्र पवार<br>अनुमोदक - डॉ. भाकरे पी.डी.<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

वरील प्रमाणे ऐनवेळी आलेल्या विषयावर चर्चा झाल्यानंतर मा० अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(signature) (signature)

सचिव
महाविद्यालय विकास समिती
कृष्णा महाविद्यालय रेठरे बु॥

अध्यक्ष
महाविद्यालय विकास समिती
कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु॥